महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहत जवळ, विद्यानगर, मिरज- ४१६४१०दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३)२२३१४२३,

---

जा.क्र.:-शांतनिमि/वि वि/उ.प.२०२०/१५७६ दिनांक :-२३/०९/२०२०

**परिपत्र :-**

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता Carry Forward अंतर्गत प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या असलेल्या बॅकलॉग विषया बाबत.. ...**

**संदर्भ:-मा.प्र.सचिव म.रा.तं.शि.मडळ ,मुंबई यांच्या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिम/का-४०/लले/उ.प.२०२०/२०२०/ ४१ दिनांक २१/०९/२०२०**

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, Carry Forward विद्यार्थ्यांच्या परीक्षा शैक्षणीक वर्ष२०२०-२१ चे विषम सत्र संपण्या पूर्वी संस्थास्थरावर घेण्यात येणार आहे.या बाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे मार्फत स्वतंत्र परिपत्रक प्राप्त झाले नंतर कळविण्यात येईल

तेव्हा संदर्भिय परिपत्रक सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील आधिकारी /कर्मचारी/पालक/विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन द्यावे.

(कॅप्टन डॉ. नि.पां.सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

प्रति:- सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत:- १)मुख्य नोटीस बोर्ड
२) श्री. काळे एस.पी. प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या वेबसाईट वर टाकणे करीता.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१७२

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : Secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उन्हाळी परीक्षा २०२०/२०२०/८९ दि. 21 SEP 2020

**परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता कॅरीफॉरवर्ड अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या असलेल्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-२०/परीक्षा२०२०/८३ दि. १५.०५.२०२०.

२. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/०५९ दि. १०.०९.२०२०.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबतच्या ठळक बाबी सर्व संस्थांना, विद्यार्थी व पालकांना उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. ०४ नुसार अंतीम सत्र / वर्षातील विद्यार्थी वगळुन नियमीत विद्यार्थ्यांचा उन्हाळी परीक्षा २०२० चा निकाल दि. १४.०७.२०२० रोजी जाहीर करण्यात आला आहे तसेच मुद्दा क्र. ०५ नुसार मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील RG4C नुसार पुढील सत्र/वर्ष प्रवेशासाठी पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांना कॅरीफॉरवर्ड योजनेतंर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता प्रवेशासाठी पात्रता देण्यात आली आहे. अशा अंतीम सत्र/वर्ष वगळुन व कॅरीफॉरवर्ड योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांची परीक्षा ( उदा. तृतीय सत्रात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय सत्रातील बॅकलॉग विषय व पाचव्या सत्रात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे चौथे, तिसरे, दुसरे व प्रथम सत्रातील बॅकलॉग विषय ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे विषम सत्र संपण्यापुर्वी संस्थास्तरावर घेण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

अंतीम सत्र/वर्षातील विद्यार्थी तसेच त्यांचे Lower Semester/year मधील असलेले बॅकलॉग विषयांची परीक्षा मंडळाच्या संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकातील नमुद कालावधीत घेण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांची नमुद कालावधीत संस्थास्तरावरील परीक्षा घ्यावयाची आहे अशा विद्यार्थ्यांची Paper Code नुसार यादी संस्थांना Institute Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार यादीत नमुद विद्यार्थ्यांचीच संस्था स्तरावरील परीक्षा घेण्यात यावी.

तरी सर्व संस्थाप्रमुखांना पुन:श्च या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, अंतीम सत्र/वर्ष वगळुन विद्यार्थी तसेच कॅरीफॉरवर्ड अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षेबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी तसेच त्यांचे पालकांना अवगत करावे.

( वि. र. जाधव )
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत :- उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर व औरंगाबाद यांना माहितीकरिता.